जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्याबाबत-

**महाराष्ट्र शासन**
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्र.इएनव्ही-२००९/प्र.क्र.१०१/तां.क.३
**१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन,**
**मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२.**
**दिनांक : ०८ जून, २०११**

**पहा :**

शासन निर्णय, पर्यावरण विभाग, समक्रमांकाचे दिनांक १५ मार्च, २०१०.

**<u>प्रस्तावना :</u>**

पर्यावरण विषयक व्यापक जनजागृती करण्यासाठी दिनांक ५ जून, २०१० या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राज्य स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यास उपरोक्त दिनांक १५ मार्च, २०१० च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती. सदर स्पर्धेचे आयोजन पर्यावरण विभाग, सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन (CEE) पुणे यांचेमार्फत करण्यास शासन मान्यता देण्यात आली होती. याबाबतची सर्व प्रक्रिया पूर्ण झाली असून, दिनांक ५ जून, २०११ रोजी जागतिक पर्यावरण दिनी आयोजित करावयाच्या समारंभात या पुरस्कारांचे वितरण संबंधितांना करण्यासाठी तसेच CEE यांचेमार्फत सदर स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या अनुदानापोटी शिल्लक राहिलेले अनुदान CEE, पुणे यांना मुक्त करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**<u>शासन निर्णय :</u>**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शासन स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन (CEE), पुणे यांचेमार्फत सदर कार्यक्रम राबविण्यासाठी दिनांक १५ मार्च, २०१० च्या शासन निर्णयाद्वारे CEE यांना मजूर केलेल्या रु.१०,०९,८००/- एवढया रकमेमधून रु. ५.०० लाख रक्कम CEE यांना उपरोक्त समक्रमांकाचे दिनांक १५ मार्च, २०१०च्या शासन निर्णयाद्वारे मुक्त करण्यात आली आहे. सदर रकमेच्या खर्चाबाबतचे उपयोजिता प्रमाणपत्र CEE यांनी सादर केले आहे. त्या अनुषंगाने त्यांना शिल्लक रु.५,०९,८००/- (रुपये पाच लाख नऊ हजार आठशे फक्त) एवढी रक्कम या शासन निर्णयाद्वारे मुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त रकमेचा धनादेश 'Centre for Environment Education', Pune यांच्या नावे काढण्यात यावा.

३. यासाठी होणारा खर्च मागणी क्र.यू-४-३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण,०४,प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण १०३,वायू व जल प्रदूषण प्रतिबंध-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना (०२) पर्यावरण प्रतिबंध (०२)(१३) पर्यावरण विषयक जनजागृती, शिक्षण व वातारण बदल कृति योजना (३४३५ १३०२) ३१, सहाय्यक अनुदान या लेखाशिर्षाखाली मंजूर

अनुदानातून भागविण्यात यावा. सन २०११-१२ या आर्थिक वर्षी उपरोक्त कार्यक्रमासाठी एकूण रु.३००.००लक्ष तरतूद उपलब्ध आहे.

४. सदरहू मुक्त रक्कम रु. ५,०९,८००/- लक्ष अधिदान व लेखाधिकारी यांच्यामार्फत कोषगारातून काढून **"Centre for Environment Education," Pune** यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री. दे.के. मानकर, अवरसचिव, पर्यावरण विभाग व नियंत्रण अधिकारी म्हणून श्री. श्या. ना. धकाते, उपसचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांनी **"Centre for Environment Education"Pune** यांना रु.५,०९,८००/- (अक्षरी रुपये पांच लक्ष नऊ हजार आठशे फक्त) अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून स्वतंत्र धनादेशाद्वारे वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अंदाज-२०.११/ प्र.क्र.९३/ २०११/ अर्थसंकल्प-३, दिनांक ६ मे, २०११ अन्वये विभागांना दिलेल्या अनुमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२०११०६०८१५५०३९००१ आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(दे. के. मानकर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय. मुंबई,
मुख्य सचिव यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
संचालक, सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन, सेंट्रल रिजनल सेल, पुणे,
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सायन, मुंबई,
सचिव (पर्यावरण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
महालेखापल (लेखा व अनुज्ञयेतना/लेखापरिक्षा) महा-१ व महा-२, मुंबई/नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
वित्त विभाग (अर्थ-५/व्यय-१६), मंत्रालय, मुंबई,
पर्यावरण विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.